# जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर

## पेंटींगचे कामाचे निविदा (दरपत्रक) मागविण्याबाबत सुचना

माननीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपूर यांचे आदेशान्वये सुचित करण्यात येते की, जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर येथील पेंटींगची कामे करण्याकरीता सन २०२१-२०२२ या वर्षाकरीता स्थानिक पेंटींगची कामे करणा-यांकडून/ कंत्राटदाराकडून खालील नमूद पेंटींगचे कामाचे निविदा (दरपत्रक) मागविण्यात येत आहे.

१. माननीय न्यायाधीशांचे न्यायालय कक्ष - पूर्ण पाटीवर मजकूर लिहीणे- विनाईल/पेन्ट पाटयांचे साईज - 12" x 18"

२. माननीय न्यायाधीशांचे न्यायालय कक्ष - फक्त न्यायाधीशांचे पाटीवर नांव लिहीणे -विनाईल/पेन्ट पाटयांचे साईज - 3½" x 18"

३. माननीय न्यायाधीशांचे न्यायालय निजीकक्ष - पूर्ण पाटीवर मजकूर लिहीणे - विनाईल/पेन्ट पाटयांचे साईज - 12" x 18"

४. माननीय न्यायाधीशांचे न्यायालय निजीकक्ष - फक्त न्यायाधीशांचे पाटीवर नांव लिहीणे पाटयांचे साईज - 3½" x 18"

५. न्यायालये/विभागातील कर्मचा-यांच्या पाटीवर पूर्ण मजकूर लिहीणे - पाटयांचे साईज - 8" x 12"

६. न्यायालये/विभागातील कर्मचा-यांच्या पाटीवर फक्त नावाचा मजकूर लिहीणे- पाटयांचे साईज - 2" x 12"

७. सर्व प्रकारचे फर्निचर, शासकीय वाहने व वस्तुंवर मजकूर लिहीणे

८. न्यायालयाचे आतील भिंतीवर मजकूर लिहीणे

९. न्यायालयाचे बाहेरील भिंतीवर मजकूर लिहीणे

१०. जिल्हा न्यायालयामधील शौचालयाच्या भिंतींवर स्त्री/पुरुषांची चित्रे काढणे

११. माननीय न्यायाधीश निवासस्थानी नाव बदलविणे

१२. महत्वाचे विभागाचे नावाचे फलक लावणे व पेंटींग संबंधीची विवीध प्रकारची कामे

**<u>कंत्राटीदारांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त दरपत्रकातील नमुद बाबी क्र. १ ते १२ चे दर तुलना केल्यावर ज्यांचे जास्तीत जास्त बाबींचे दर कमी असेल त्यांचे सोबत उपरोक्त सर्व बाबींचे काम करण्याचा करार करण्यात येईल तसेच असेही स्पष्ट करण्यात येते की, प्राप्त झालेल्या दरपत्रकातील सर्वात कमी दर ज्यांचे असेल त्याच कमी दरानुसार ज्यांच्याशी करार करण्यात येणार आहे त्याला त्याच कमी दरानुसार काम करावे लागेल.</u>**

इच्छूक कंत्राटीदारांना याव्दारे सुचित करण्यात येते की, त्यांनी जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर येथील ७ वा माळा, आस्थापना विभागाचे कार्यालयात निविदा (दरपत्रक) बंद लिफाप्यात **<u>रोज गुरुवार दिनांक ०८.०४.२०२१ रोजीचे सायंकाळी ५.०० वाजेपावेतो</u>** सादर करावे.

लिफाप्यावर **<u>" पेंटींगचे कामाचे निविदा (दरपत्रक) "</u>** असे नमूद करावे व माननीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपूर यांचे नावाने लिफाफा पाठवावा.

उपरोक्त दरपत्रक सुचना https://districts.ecourts.gov.in/nagpur किंवा <u>https://court.mah.nic.in/courtweb</u> या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आले आहे.

दिनांक ३१/०३/२०२१.

आदेशान्वये,

01/4/21

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, नागपूर